# मिरा भाईंदर महानगरपालिका

# माहिती व जनसंपर्क विभाग

# प्रेसनोट

## ❖ मिरा भाईंदर महानगरपालिका मार्फत स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी विशेष जागरूकता मोहीम

मिरा भाईंदर महानगरपालिका शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी कायम प्रयत्नशील असते. त्यासाठी अनेक नवे नवे कल्पक उपक्रम राबवून नागरिकांना त्यात उत्साहाने सहभागी होण्यासाठी वेळोवेळी आवाहन करीत असते. स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत केंद्रीय मंत्रालयाने जाहीर केलेल्या QR कोडवर नागरिकांना आपला अभिप्राय (फीडबॅक) नोंदवता येणार आहे. या संदर्भात महानगर पालिकेने जागरूकता मोहीम चालू केली असून नागरिकांनी या मोहिमेत सहभागी होऊन ही मोहीम यशस्वी करण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे. महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी, नागरिकांना या प्रकियेत सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करीत आहेत. सोशल मिडिया किंवा महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाइटवरील अभिप्राय लिंक किंवा QR कोड स्कॅन करून नागरिकांनी आपला अभिप्राय (फीडबॅक) नोंदवायचा आहे. केंद्र शासनाच्या वतीने अधिकृत रित्या लिंक व क्यूआर कोड जाहीर करण्यात आला असून यामध्ये नागरिकांनी उत्स्फूर्तरीत्या सहभाग नोंदवायचा आहे. आपल्या शहराच्या हितासाठी नागरिकांनी आपला अभिप्राय नोंदवणे अत्यंत आवश्यक आहे. स्वच्छ सर्वेक्षणासाठी मूल्यांकनाच्या मापदंडांमध्ये तीन स्तर असतात, ज्यामध्ये नागरिकांचा अभिप्राय समाविष्ट आहे.

अभिप्राय नोंदवण्यासाठी या खालील 10 प्रश्नांची उत्तरे द्यावीत

1. कधीच तुम्हाला तुमच्या घर/दुकानातून कचरा उचलण्यासाठी एखादी व्यक्ती येते का?

2. तुमच्या आवासीय क्षेत्रातील स्वच्छतेचे आणि नियमित सफाई कामाचे तुम्ही किती प्रमाणात मूल्यांकन करता?

3. तुमच्या क्षेत्रात किती वेळा, कुठे-कुठे कचरा दिसतो?

4. तुम्ही तुमच्या घरात असलेला कचरा सूखा आणि ओला असा वेगळा करतात का?

5. कचरा संकलक कचरा वेगळ्या श्रेणीत वर्गीकरण करून वाहने लोड करतो का किंवा सगळा कचरा एकत्र करून ठेवतो का?

6. तुम्हाला काय वाटते की स्थानिक अधिकारी सार्वजनिक स्थळे जसे की बाजार, उद्याने, सार्वजनिक बागा किंवा अन्य ठिकाणे स्वच्छ ठेवण्यात किती प्रभावी आहेत?

7. कचरा व्यवस्थापनासाठी रिड्यूस, रीयूज, रीसायकल केंद्रे आहेत का..? याबद्दल तुम्हाला माहिती आहे का?

8. तुम्हाला माहिती आहे का की नगरपालिकेने सीवरेज आणि सॅनिटेशन टँक साफ करण्यासाठी फक्त प्रमाणित ऑपरेटरच कामावर ठेवावे का ?

9. तुम्ही तुमच्या क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांच्या साफसफाई आणि देखभालीबद्दल किती समाधानी आहात?

10. तुम्ही कधी स्थानिक प्रशासनाला स्वच्छतेशी संबंधित समस्या नोंदवली आहे का, आणि त्यावर कोणते उपाय करण्यात आले?

तरी, नागरिकांनी सदरच्या प्रश्नांची अचूक उत्तरे देऊन आपला अभिप्राय नोंदवावा. आणि स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.